# कोटेशन नोटीस

प्रति,                                                                                     दि.   /   /२०२१

...............................................................

...............................................................

.................................................................

विषय:- बॅ.बाळासाहेब खर्डेकर ज्ञान स्त्रोत केंद्रात फुल हाईट टर्नस्टाईल गेट दुरुस्त करून मिळणेबाबत

महोदय,

उपरोक्त विषय संदर्भात कळविण्यात येते की, बॅ.बाळासाहेब खर्डेकर ज्ञान स्त्रोत केंद्रात फुल हाईट टर्नस्टाईल गेट दुरुस्त करून घ्यावयाचे असून या अनुषंगाने करावयाच्या दरकरार संदर्भातील शर्ती व अटी खालील प्रमाणे असतील.

१. फुल हाईट टर्नस्टाईल गेट तपशील ग्रंथालयात उपलब्ध आहे. त्याची माहिती घेवून दरपत्रकामध्ये दर नमुद करावा.

२. फुल हाईट टर्नस्टाईल गेट दुरुस्तीकरिता नमुद दर हे सर्व कर समावेशक व विद्यापीठ पोहोच असावेत.

३. दुरुस्तीबाबतची सूचना प्राप्त होताच २४ तासात भेट आयोजित करुन दुरुस्ती वेळेत करुन द्यावयाची आहे. अन्यथा विलंब शुल्क प्रती दिवशी रु.१००/- याप्रमाणे आकारले जाईल.

४. फुल हाईट टर्नस्टाईल दुरुस्तीसाठी आवश्यक सर्व साहित्य, उपकरणे व सुट्टे भाग आपण उपलब्ध करुन द्यावयाचे आहेत. व ज्या त्या ठिकाणी ते वापरावयाचे देखील आहे. फुल हाईट टर्नस्टाईल गेट दुरुस्ती मागणीनुसार नसल्यास अथवा खराब आढळून आल्यास ते स्वखर्चाने व वेळेत दुरुस्त करावे लागेल.वरील माहिती खेरीज दरपत्रक विचारात घेतले जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

५. पुरवठा आदेशापोटी आगाउ रक्कम दिली जाणार नाही.

६. फुल हाईट टर्नस्टाईल दुरुस्त केल्यानंतर त्याचे देयक दोन प्रतीत आगाउ पोहोच पावतीसह द्यावे लागेल.

७. देयकाची रक्कम काम समाधानकारक झाल्याचे संबंधित विभागाने प्रमाणित केल्यानंतर अदा करण्यात येईल.

८. जर वरील काम करण्यास तयार असाल तर त्याचे दर सोबतच्या विहित नमुन्यात (निशान 'अ' )बंद लिफाफ्यामधून विद्यापीठाच्याआवक -जावक कार्यालयास दि.१५ /०२/२०२१ पर्यंत पोहोच होतील अशा रितीने पाठवावे. बंद लिफाफ्यावर "बॅ.बाळासाहेब खर्डेकर ज्ञान स्त्रोत केंद्रात फुल हाईट टर्नस्टाईल गेट दुरुस्त करण्याचे दरपत्रक " असा उल्लेख करावा. मुदतीनंतर आलेल्या दरपत्रकाचा विचार केला जाणार नाही.

९. कोणतेही दरपत्रक अथवा सर्व दरपत्रके कोणतेही कारण न देता मंजूर अथवा नामंजूर करण्याचा अधिकार या कार्यालयाने राखून ठेवला आहे.

१०. दर मान्य झाल्यानंतर रु.१०० /- च्या मुद्रांकावर विहित नमुन्यात करार करावा लागेल. मुद्रांकाचा खर्च पुरवठा धारकाने करावयाचा आहे.

११. दर मंजुर झाल्यास पुरवठा केलेल्या साहित्याच्या एकुण रक्कमेच्या ३% रक्कम सुरक्षा ठेव म्हणून जमा करावी लागेल. सदर रक्कम सहा महिन्यानंतर परत दिली जाईल. सहा महिन्यात दुरुस्त केलेले फुल हाईट टर्नस्टाईल गेट ख़राब झाल्यास पुरवठाधारकाने ते पुन्हा पुर्ववत दुरूस्त करून दयावयाचे आहे.

१२. कामकाजासाठी जागा, वीज विद्यापीठ उपलब्ध करून देईल.

आपली विश्वासू,

संचालक,

बॅ.बाळासाहेब खर्डेकर ज्ञान स्त्रोत केंद्र